# नोहा प्रमाणे देवाबरोबर चालणाूया सर्वांचे तो तारण करतो

**मुलांना शिकवणाूयांनी S1b हा अभ्यास वाचावा.**

**प्रार्थना :** ''हे आमच्या तारणाूया उद्धारक देवा, ज्या लोकांना आम्ही तुझी सुवार्ता सांगितली आहे त्यांचे कृपा करुन तारण कर. येशूने परत येऊन आमची मरणापासून सुटका करण्याची वाट आम्ही पाहात आहोत तोपर्यंत आम्हांला वाईटापासून दूर ठेव.''

**1. तारणाचा आंनद लुटण्यासाठी तुमच्या मंडळीची तयारी करा आणि पातक्यांना तारणाूयाकडे आणा.**


**पार्श्वभूमि. उत्त्पत्ती 6:5 ते 9:19** मधून नोहाचा कथावृत्तांत वाचा.

**पाहा उत्तपत्ती 6:5-13** मध्ये देवाने त्याने निर्माण केलेल्या लोकांचा नाश का केला.

**पाहा उत्त्पत्ती 6:8-9 मध्ये** देवाने मोठया जलप्रलयातून नोहा व त्याचे कुटुंब ह्यांना कसे वाचवले.

*(उत्तरे : नोहा व त्याच्या कुटुंबाने तारु बांधले आणि ते त्यात राहण्यास गेले त्यामुळे ते बुडाले नाहीत. मूळ हिब्रू भाषेत 'तारु' म्हणजे मोठी पेटी. नोहाचे तारु म्हणजे जहाजाप्रमाणे पाण्यावर तरंगणारी मोठी पेटी होय).*

पुनरुत्थित येशूने आम्हांला सर्व राष्ट्रांना तीन गोष्टी सांगण्याची आज्ञा केली आहे त्या पाहा लूक 24:46-48 मध्ये.



*(उत्तरे : येशूचे मरण, त्याचे पुनरुत्थान आणि पश्चात्ताप करणाूयां सर्वांना देवाची क्षमा)*

पाहा लूका 24:46 मध्ये आमचे तारण करण्यासाठी येशूने केलेली दोन महान कृत्ये.

*[उत्तर : (1) त्याने सांडलेल्या रक्तामुळे देवाने आमच्या पापांची क्षमा केली, 1 योहान 1:7, (2) त्याच्या पुनरुत्थानाच्याद्वारे त्याने आम्हांला नवे, पवित्र सार्वकालिक जीवन दिले, रोम 9:3-14]*

**पाहा :** (1) इफिस. 2:6 मध्ये कोणाच्या ठायी आम्हांला स्वर्गात उठविले आहे? (2) **1 करिंथ 12:21-13 मध्ये** कोणाच्या द्वारे आमचे पुनरुत्थान होते. (4) **रोम 6:3-14** मध्ये नव्या, पवित्र जीवनात उठवले जाण्यासाठी आम्ही कशाला मेले पाहिजे. (5) **1 पेत्र 3:18-22** मध्ये, तारु हे येशूच्या पुनरुत्थित शरीराचे प्रतिक कसे आहे.

*[उत्तर : (1) ख्रिस्त, (2) पवित्र आत्मा, (3) येशू, (4) पाप, (5) नोहाचे प्रचंड तारु हे ख्रिस्ताच्या पुनरुत्थित शरीराचे प्रतिक आहे कारण येशूच्या शरीराप्रमाणे हे देखील एक साधन होते. देवाबरोबर चालणाूयांची मरणापासून सुटका झाली. आपण ख्रिस्तामध्ये, त्याच्या सार्वकालिक शरीरात नव्या, पवित्र आणि सार्वकालिक जीवनात उठवले गेलो आहोत. येशू आमचे तारु आहे]*

**पाहा** 1 पेत्र 3:21 मध्ये पेत्राने स्पष्ट केलेले बाप्तिस्म्याचे दोन पैलू.

*[उत्तर : (1) देहाचा मळ पाण्याने काढून टाकणे, (2) शुद्ध भाव असणे. स्वाभाविक पाणी किंवा देवाने केलेले आध्यात्मिक शुद्धीकरण यापैकी बप्तिस्म्याचा कोणता पैलू तारणाच्या वाटेकडे नेतो?*

*(उत्तर : पेत्र स्पष्ट करतो की, केवळ देहाचा मळ पाण्याने धुतला म्हणून आमचे तारण होत नाही तर शुद्ध विवेकभाव राखणाूयांना येशूच्या पुनरुत्थानात वाटा आहे. 'शुद्ध विवेकभावासाठी' विश्वास आणि पश्चात्ताप ह्यांची आवश्यकता असते, योहान 3:16, प्रे.कृ. 2:38)*

**पाहा** उत्पत्ती 17:19-22 मध्ये सदोम व गमोरा ह्या  नगरांचा देवदूताने नाश केला तेव्हा देवाने गावा बाहेर सुरक्षित ठिकाणी पाठवले.

**पाहा** 2 पेत्र 2:4-9 मध्ये देव आम्हा विश्वासणृायांची अध्यात्मिक मरण अणि न्यायनिवाडा या पासून कशी सुटका करतो हे दाखवण्यासाठी पेत्राने शारीरिक मरणापासून सुटकेची दोन उदाहरणे दिली आहेत.

*[उत्तरे : (1) देवाने नोहा व त्याचे कुटुंबिय ह्यांचे प्रचंड जलप्रलयापासून रक्षण केले, (2) देवाने लोट व त्याच्या कुटुंबाची अग्नी वर्षावापासून सुटका केली]*

**पाहा** निर्गम 14:21-31 मध्ये देवाने इस्राएल लोकांची कशी सुटका केली.

*(उत्तर : त्याने त्यांची सुटका करण्यासाठी समुद्राचे दोन भाग केले आणि मग त्यांचा पाठलाग करणृाया ईजिप्तच्या सैन्याला त्याच समुद्रात बुडवले)*

**पाहा** येशू त्याच्यावर भरवसा ठेवणृायांची कोणत्या गोष्टींपासून सुटका करतो. (1) **लूक 7:36-50** पापी लोक, (2) **मत्तय 4:23-25,** आजारी, (3) **मार्क 6:34-42** भुकेले लोक, (4) **मार्क 5:1-15** भुताने पछाडलेले, (5) **लूक 7:11-16** जे मरण पावले, (6) **लूक 17:12-19** अशुद्ध लोक.

*[उत्तरे : (1) त्याने त्यांच्या पापांची क्षमा केली, (2) त्याने त्यांना आरोग्य दिले, (3) येशूने थोडेसे अन्न बहुगुणित करुन त्यांना जेवू घातले, (4) त्याने लोकांची दुष्ट आत्म्यांपासून सुटका केली, (5) त्याने केव्हा केव्हा लोकांना मरणातून उठवले, (6) त्याच्यावर विश्वास ठेवणृाया कुष्ठरोग्यांना त्याने शुद्ध केले]*

येशू सर्व विश्वासणृायांसाठी काय करणार आहे ते पुढील शास्त्रभागात पाहा : (1) योहान 6:39-47, (2) मत्तय 25:31-40, (3) 1 थेस्सल 1:8-10, (4) कलस्सै 2:15

*[उत्तेर : (1) मरण पावलेल्या विश्वासणृायांना त्यांच्या कबरेतून सार्वकालिक जीवनात उठवणार, (2) तो परत येईल तेव्हा सर्व विश्वासणृायांना प्रतिफळ देणार आहे, (3) देवाच्या येणृाया क्रोधापासून आमचे रक्षण करणार, (4) सैतानी सामर्थ्यापासून सुटका.*

**पाहा** आम्ही काय केले म्हणजे देव आमचे सर्वकाळासाठी तारण करील : (1) इफि 2:8-10 , (2) प्रे.कृ. 2:37-38, (3) 1 थेस्सल 1:8-10, (4) इब्री 5:7-9

*[उत्तरे : (1) विश्वास ठेवणे, (2) पश्चात्ताप करणे, (3) येशू स्वर्गातून परत येईपर्यन्त वाट पाहा, (4) येशूची आज्ञा पाळा.*

## 2. आगामी आठवडयातील कार्यक्रमांविषयी तुमच्या सहकार्यांशी चर्चा करा

तुमच्या मंडळीला भेट देणृायांच्या घरी जाऊन तारण प्राप्त करुन घेण्यासाठी आमंत्रण द्या.

आजृायांना, निराश झालेल्यांना तसेच दु:खी पीडीतांना भेटा आणि त्यांच्या त्रासापासून त्यांची सुटका व्हावी याकरीता प्रार्थना करा.

## 3. आगामी उपासने विषयी सहकार्यांशी चर्चा करुन योजना आखा.

नोहाचा कथावृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा. देवाने अनेक वाईट गोष्टीपासून लोकांची सुटका कशी केली (पाहा वरील भाग 1).

आज लोकांना सार्वकालीक तारण कसे मिळवता येते ते **स्पष्ट करा** मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका सादर करू द्या. त्यांनी मोठया माणसांना प्रश्न विचारावेत.

विश्वासणूायांनी **लहान गट** तयार करुन त्यांचे नातेवाईक व मित्रमंडळी ह्यांच्या तारणासाठी प्रार्थना करा. तुमच्या देशातील दुर्लक्षीत वांशिक गटाच्या लोकांचे प्रभूने तारण करावे याकरीता प्रार्थना करा.

**पाठ करा** 1 पेत्र 3:21-23.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी ईजिप्त** मध्ये प्रथम जन्मलेले मारुन टाकण्यासाठी देवाचा दूत रात्री फिरणार होता तेव्हा त्यापासून बचाव व्हावा याकरीता इस्राएल लोकांनी त्यांच्या घराच्या दोन्ही दार बाह्यांना व कपाळपट्टीला कोकराचे रक्त लावायचे होते, निर्गम 12:1-14. प्रभुभोजनाद्वारे आपण प्रभू येशूच्या रक्तामध्ये विश्वासाने सहभागी होतो. त्या विश्वासानेच आमचे कसे तारण होते ते स्पष्ट करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net